**विशेष शाखा**

**१) फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे**
**मतदान केंद्राचे १०० मीटरचे परिक्षेत्रातील व्यावसायिक दुकाने व आस्थापना बंद ठेवणेबाबत आदेश.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.८/का-८ दिनांक ०९/११/२०२२ रोजीच्या प्ररिध्दीप्रत्रकान्वये ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मीत तसेच समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसल्यामुळे मागील निवडणुकांमधून वगळलेल्या अशा सुमारे ७७५१ ग्रामपंचायतींसाठी (सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील १२ ग्रामपंचातीची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आहे. त्याची आचारसंहिता दिनांक १८/११/२०२२ रोजीपासून सुरु होवून निवडणुकीचा निकाल जाहीर होई पर्यंत अस्तित्वात राहील. दिनांक १८/१२/२०२२ रोजी मतदान होणार असून, दिनांक २०/१२/२०२२ रोजी मतमोजणी होणार आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील निवडणूक होणाऱ्या एकुण १२ ग्रामपंचायतीपैकी ०२ (शिरगाव व येलवाडी) ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक बिनविरोध झालेली आहे. उर्वरीत १० ग्रामपंचायतीपैकी चाकण पोलीस स्टेशन हदीत ०६ ग्रामपंचायतीचे (०६ मतदान केंद्र- १७ बुथ) तळेगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन हदीत ०१ ग्रामपंचायतीचे (०२ मतदान केंद्र- ०६ बुथ) शिरगाव - परंदवडी पोलीस स्टेशन हदीत ०१ ग्रामपंचायतीचे (०१ मतदान केंद्र- ०३ बुथ ) व महाळुंगे पोलीस चौकी हदीत ०२ ग्रामपंचायतीचे (०२ मतदान केंद्र- ०५ बुथ) असे एकुण मतदान ११ केंद्रे (इमारती) व ३१ बुथचा समावेश आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात एकुण ११ मतदान केंद्रे (इमारती) व ३१ बुथवर मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पडण्यासाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये व सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर मतदान केंद्रांचे परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने एकुण ११ मतदान केंद्रांचे (इमारती) १०० मिटर परिसरात निर्बंध घालणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक - २०२२ अनुषंगाने एकुण ११ मतदान केंद्रांचे (इमारतीच्या) परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये दिनांक १८/१२/२०२२ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) ग्रामपंचायत सार्वत्रिक निडणुक - २०२२ अनुषंगाने एकुण ११ मतदान केंद्राच्या (इमारतीच्या) परिघापासुन १०० मीटर सभोवतालच्या परिसराचे आतील सर्व व्यावसायिक, व्यावसायिक दुकाने, रेस्टॉरन्ट, टपऱ्या, वाणिज्यिक आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना व तत्सम बाबी बंद ठेवाव्यात.

२) मतदान केंद्र व परिसरातील भागात कोणत्याही प्रकारची हत्यारे, अग्निशस्त्रे जवळ बाळगता येणार नाहीत. सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना (पोलीस दल, संरक्षण दल, तुरुंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांना ) लागू राहणार नाही.

३) मतदान केंद्र व परिसरात मोबाईल फोन, टॅबलेट्स, लॅपटॉप वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे.

(कर्तव्यावर असणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागू राहणार नाही. )

सदरच्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.सं.कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

**सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दिनांक १५/१२/२०२२ रोजी देणेत आला आहे.**



Scanned with CamScanner